## नियमित दिवाणी दावा क्र. ५९/२०२१ मधील नि.क्र. १७ वरील आदेश

प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ७ अनुसार वाद रस्त्याची पाहणी करणे करिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे करिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन की, वादीने प्रतिवादींविरुद्ध निरंतर मनाई हुकूम आणि नुकसानची चौकशी करण्याचा दावा दाखल केलेला आहे. वादीने दाव्यात अंतरिम मनाई हुकूम मिळणे करिता अर्ज केलेला आहे. वादीने दाव्यात कथन केलेले आहे की, वादी मौजे हिंगणा निंबा, तालुका बाळापूर, जिल्हा अकोला येथील शेत गट नंबर १७, क्षेत्र २ हेक्टर ४३ आर सामाईक हिस्सा या शेतीच्या मालक व ताबेदार आहेत. वादी यांचे शेत गट नंबर १७ हिंगणा शिवारात प्रतिवादी क्रमांक १ यांचे शेत गट नंबर ३४१ व प्रतिवादी क्रमांक ३ यांचे शेत गट नंबर ३३६ निंबा शिवारात आहे. प्रतिवादी क्रमांक १ व ३ त्यांचे शेतात जाणे येणे व वहिवाटी करिता निंबा शिवारातूनच रस्ता आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक २ यांचे शेत गट नंबर ६ मौजे पाळोदी, तालुका शेगाव, जिल्हा बुलढाणा येथे त्यांच्या शेतात जाणे येणे व वहिवाटी करिता वादी यांचे शेताचे मधातून हिंगणा ते पाळोदी रस्ता आहे. वादींचे पुढे असे कथन की, तरीसुद्धा प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी बळजबरीने कोणताही अधिकार नसताना अंदाजे ३–४ महिन्यापूर्वी वादी यांच्या शेतात चे पूर्व बाजूस असलेल्या धुऱ्यावरील माती आणि शेतातील माती जेसीबीच्या साह्याने खोदून लगत असलेल्या नाल्यात टाकून रस्ता तयार केला आहे व सदर रस्त्याच्या वापर प्रतिवादी स्वतःचे शेतामध्ये जाणे येणे करिता वहिवाटीचा रस्ता म्हणून करीत असल्याने वादी यांचे शांततामय ताबे वहिवाटीस अडथळा निर्माण केला आहे. त्याचप्रमाणे वादींचे कथन की, प्रतिवादी वादी व त्याचे कुटुंबातील सदस्यांना अश्लील शिवीगाळ करून धमकी देतात.

३. परंतु वास्तविक वस्तुस्थिती अशी आहे की, हिंगणा निंबा तालुका बाळापूर जिल्हा अकोला येथील शेत गट नंबर १७ क्षेत्र १२ हेक्टर ६३ आर पैकी ० हेक्टर ३० आर शेत प्रतिवादी क्रमांक १ यांचे भाऊ प्रकाश यशवंत तायडे यांचे मालकी ताबेवहीवाटीचे असून ते पुणे येथे खाजगी नोकरी करीत असल्याने मागील दहा वर्षापासून

प्रतिवादी क्रमांक १ त्याची वहिती करतात. प्रतिवादी क्रमांक १ यांचे मालकी ताबे वहिवाटीचे मौजे निंबा, तालुका बाळापूर, जिल्हा अकोला येथील गट नंबर ३४१ क्षेत्र ० हेक्टर ८८ आर ही शेत जमीन आहे. प्रतिवादी क्रमांक २ यांचे मालकी ताबेवहीवाटीतील मौजे पाळोदी, तालुका शेगाव, जिल्हा बुलढाणा येथील शेट गट नंबर ६, क्षेत्र ३ हेक्टर २५ आर, पोट खराब १२ आर पैकी १ हेक्टर ६३ आर व पोट खराब ० हेक्टर ०६ आर वडिलोपार्जित शेती आहे. शेत गट नंबर ६ मधील १ हेक्टर ६३ आर ० हेक्टर ०६ आर ही शेती प्रतिवादी क्रमांक ३ प्रल्हाद तायडे यांची काकू चंद्रभागा समाधान तायडे, चुलत बहीण व चुलत भाऊ यांचे मालकी ताबे वहिवाटीची आहे. प्रतिवादी क्रमांक ३ ची काकू चंद्रभागा तायडे चुलत भाऊ हे मुंबई येथे राहत असून चुलत बहिणींचे लग्न झालेले आहे त्यामुळे सदर शेतीची देखभाल व वहिती प्रतिवादी क्रमांक ३ करतात.

४. प्रतिवादी त्यांचे वर नमूद शेतामध्ये जाण्यासाठी सर्वप्रथम हिंगणा गावांमधून पुढे गट नंबर १६ चे पश्चिमेकडील धुऱ्याचे आतून व पुढे शेत गट नंबर १७ चे पश्चिमेकडील धुऱ्याचे आतून उत्तरेकडून दक्षिणेकडे असलेल्या वहिवाटीच्या रस्त्याचा वापर करतात. तसेच बैलगाडी व शेत उपयोगी वाहने ने–आण करतात. सदर रस्ता प्रतिवादी यांचा बैलगाडीचा वहिवाटीचा रस्ता असून मागील ५० वर्षांपूर्वी पासून अस्तित्वात आहे. प्रतिवादी यांना सदर वहीवाटीचे रस्ता व्यतिरिक्त दुसरा कोणताही रस्ता नाही.

५. वादीचे दाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादी क्रमांक १ व ३ यांना त्यांचे शेतात जाणे येणे व वहिवाटी करिता निंबा शिवारातून रस्ता असून वादी क्रमांक २ यांना त्यांचे शेत गट नंबर ६ मध्ये जाणे येणे व वहिवाटी करिता वादी यांच्या शेतातून हिंगणा ते पाळोदी रस्ता आहे. याउलट प्रतिवादींचे कथनाप्रमाणे त्यांना उपरोक्त नमूद हिंगणा गावांमधून पुढे गट नंबर १६ आणि १७ च्या पश्चिमे कडील धुऱ्याच्या आतून उत्तरेकडून दक्षिणेकडे वहिवाटीचा रस्ता आहे. दाव्याचे स्वरूप आणि रस्त्याबाबतची उभय पक्षांची वस्तुस्थिती लक्षात घेता वहिवाटीचा रस्ता पाहणे करिता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे आवश्यक आहे. न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, याउलट वादीने दाखल केलेल्या अंतरिम नाही हुकूमाच्या अर्ज गुणवत्तेवर निकाली काढणे सोयीचे होईल. म्हणून सदर अर्ज मंजूर करावा.

६. वादीने प्रस्तुत अर्जावर निशाणी १९ अन्वये म्हणणे दिलेले असून अर्जातील अभिलेखाचा भाग सोडून उर्वरित विधाने नाकारलेली आहे. वादीचे म्हणणे की, प्रतिवादी यांनी न्यायालयापासून वस्तुस्थिती लपवून न्यायालयाची दिशाभूल करीत आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी जबाबात नमूद केलेल्या रस्त्या बाबतचा मजकूर खोटा आहे. या उलट प्रतिवादी क्रमांक २ यांनी तहसीलदार, शेगाव यांचे न्यायालयात दिनांक २२.११.२०२१ रोजी दाखल केलेल्या लेखी जबाबात त्यांचे पूर्वजापासून गट नंबर ६ व ७ यांचा रस्ता गट नंबर ४ या भागातून आहे असे नमूद केलेले आहे. वादी यांनी दिनांक २५.०३.२०२२ रोजी निशाणी ५ वर लेखी युक्तिवाद दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने दिनांक १६.०४.२०२२ रोजी प्रस्तुत अर्ज हेतू पुरस्करपणे दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी खोटी परिस्थिती निर्माण करू शकतात, त्यामुळे वादी यांना त्यांच्या मनाई हुकूम मिळण्याच्या कायदेशीर हक्कापासून वंचित राहावे लागणार. म्हणून प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावा.

७. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादी त्यांचे शेतावरील मालकी हक्काबाबत कोणताही वाद नाही. परंतु वादी आणि प्रतिवादी यांचेत वहिवाटीच्या रस्त्यावरून वाद दिसुन येत आहे. वादीचे कथनानुसार, प्रतिवादी यांना त्यांच्या शेतात जाण्याकरिता रस्ता उपलब्ध असताना त्यांनी वादीचे शेताच्या पूर्वेकडील धुरा जेसीबी यंत्राने खोदून नाल्यात माती टाकून नवीन रस्ता तयार केलेला आहे. याउलट प्रतिवादींचे म्हणणे की, सदर रस्त्याचा वापर ते मागील ५० वर्षापासून त्यांचे पुर्वजापासुन करीत आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम ७ प्रमाणे स्थळ निरिक्षण करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे. म्हणुन सदर तरतुद पाहणे आवश्यक आहे ते खालीलप्रमाणे –

> ७. दाव्याची विषयवस्तु अटकावुन ठेवणे, तिचे जतन करणे, पहाणी करणे, इत्यादी :–
>
> (१) एखाद्या दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावरुन आणि न्यायालयास योग्य वाटतील अशा अटींवर, न्यायालयाला, –

(क) अशा दाव्यातील विषयवस्तु असलेली किंवा त्या दाव्यात जिच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित होईल अशी कोणतीही मालमत्ता अटकावुन ठेवणे, तिचे जतन किंवा पाहणी करणे, इत्यादींसाठी आदेश देता येईल :

(ख) पूर्वोक्त अशा सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी, कोणत्याही व्यक्तीला अशा दाव्यातील इतर कोणत्याही पक्षकाराच्या कब्जात असलेल्या कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीमध्ये प्रवेश करण्याचा प्राधिकार देता येईल : आणि

(ग) पूर्वोक्त अशा सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी, संपुर्ण माहिती किंवा पुरावा मिळण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित वाटेल त्याप्रमाणे कोणतेही नमुने घेण्याचा किंवा कोणतेही अभिक्षण करण्याचा किंवा प्रयोग करुन बघण्याचा प्रधिकार देता येईल.

(२) आदेशिकेच्या बजावणीबाबतचे उपबंध (तरतुदी) योग्य त्या फेरफरांसह, या नियमान्वये प्रवेश करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यकतींना लागू होतील.

८. वरील तरतुदीला अधिन राहुन प्रस्तुत प्रकरणात स्थळ निरिक्षण करण्याची आवश्यकता आहे किंवा नाही ते पाहावे लागेल. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे दोन्ही पक्षांनी त्यांचे कथन सिध्द करणे करीता अभिलेखावर हिंगणा निंबा येथील तलाठीने दिलेले स्थळ पाहणीचे अहवाल दाखल केलेले आहेत. दोन्ही स्थळ पाहणी अहवालांचे अवलोकन केल्यास सदर दोन्ही अहवाल परस्पर विरोधाभासी असल्याचे दिसुन येत आहे. वादी यांनी दाखल केलेल्या नि.क्र. १५/३ वरील स्थळ पाहणीच्या अहवालात प्रतिवादी यांनी जेसीबीच्या साह्याने वादीच्या शेताच्या पूर्वेकडील धुरा खोदून लगतच्या नाल्यात माती टाकून नवीन रस्ता तयार केल्याचे आढळुन आल्याचे नमूद केलेले आहे. वादीने सदर कथनापुष्टयर्थ अभिलेखावर छायाचित्रे दाखल केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक ३ यांनी नि.क्र. २८ वर पुरसीस दाखल करून वादीचा शेतातील धुऱ्यावर कोणतीही हरकत करणार नसल्याचे कथन केलेले आहे. याउलट प्रतिवादी यांनी

दाखल केलेल्या दि. १९.०७.२०२१ रोजीच्या स्थळ पाहणी अहवालात मौजे हिंगणा निंबा येथील गट नं. १७ मधुन येणे जाणेचा रस्त्यावर वादीने ३ खड्डे करुन समोर जाणेस अडथळा निर्माण केलेला असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु सदर कागदपत्रांचे अवलोकनावरुन प्रतिवादी यांनी नविन रस्ता तयार केला किंवा कसे याबाबत कोणताही बोध होत नाही. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथन पाहता स्थळ निरीक्षण केल्यास वादीच्या शेताच्या पूर्वेकडील धुरा प्रतिवादी यांनी जेसीबीने खोदून नवीन रस्ता तयार केला किंवा सदर रस्ता पूर्वीपासून अस्तित्वात आहे या सर्व बाबी स्पष्ट होतील. त्यामुळे न्यायालयाला न्यायदान करणेस मदत होईल. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करणेस पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. न्यायालयीन आयुक्त म्हणून विधीज्ञ श्री. बी. एस. भाजीपाले यांची नेमणुक करण्यात येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी उभय पक्षांसमक्ष दावामिळकत गट नं.१७ च्या पूर्वेकडील धुरा प्रतिवादी यांनी जेसीबीने खोदून नवीन रस्ता तयार केला किंवा सदर रस्ता पूर्वीपासून अस्तित्वात आहे याबाबत चौकशी करुन स्थळ निरीक्षण करुन त्याबद्दल सविस्तर अहवाल न्यायालयात १ महिन्याच्या आत सादर करावा.

४. न्यायालयीन आयुक्त शुल्क रु.३०००/– प्रतिवादी यांनी सोसावा.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.10.21 11:17:10 +0530

दिनांकः १९.१०.२०२४
बाळापूर.

(श्रीमती डी. एम. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
बाळापूर.

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Smt. D. M. Patil**<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | A.S.Gawali |
| Date of Decision | :- | 19/10/2024 |
| Order signed by P.O on | :- | 19/10/2024 |
| Order uploaded on | :- | 21/10/2024 |